# जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

| | |
|---|---|
| वेब साईट :- www.nanded.gov.in | ई-मेल :- dygennanded@gmail.com |
| दूरध्वनी क्रं.:- ०२४६२-२४०३०३ | फॅक्स क्रं.:- ०२४६२-२३८५०० |
| शाखा :- धर्मादाय विभाग | **जा.क्रं.2018/धर्मादाय/गुरुव्दारा बोर्ड निवडणुक/ सिआर-12** |

**दि. 25 /10/2018**

वाचा:- 1. नांदेड शिख गुरुव्दारा सचखंड श्री हजूर अपचलनगर साहिब मंडळाच्या तीन सदस्य निवडणुक 2018 साठी मतदार यादी कार्यक्रमाबाबत या कार्यालयाचे समक्रमांकीत पत्र, दि.03/07/2018

2. अधिक्षक गुरुव्दारा सचखंड बोर्ड, नांदेड यांचे पत्र क्र.3069/18-19 दिनांक:-28/09/2018

**विषय:- नांदेड शिख गुरुव्दारा सचखंड श्री हजूर अपचलनगर साहिब मंडळाच्या तीन सदस्य निवडणूक 2018 साठी अंतिम मतदार यादी प्रसिध्दीच्या दिनांकात बदल करणेबाबत.**

**शुध्दीपत्रक**

महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग, मंत्रालय मुंबई अधिसूचना क्रमांक:-जीयुआर-2018/प्र.क्र.67/ ज-7 (अ), दिनांक 27 जून 2018 नुसार नांदेड शिख गुरुव्दारा सचखंड श्री हजूर अपचलनगर साहिब बोर्ड अधिनियम 1956 चे कलम 6 (1) (ii) नुसार नांदेड शिख गुरुव्दारा सचखंड श्री हजूर अपचलनगर_साहिब मंडळाच्या तीन सदस्यांना निवडुन देण्यासाठी मतदार क्षेत्र औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, उस्मानाबाद, नांदेड, बीड लातूर, हे संपुर्ण जिल्हे व चंद्रपुर जिल्ह्यातील राजूरा, कोरपना व जीवती हे तालुके (तत्कालीन हैद्राबाद निजाम संस्थानाचा महाराष्ट्रातील भाग) येथील महाराष्ट्र विधानसभेसाठी दि.01 जुलै 2018 या अर्हता दिनांकास अस्तित्वात असलेली विधानसभा मतदार यादीतील समाविष्ट शिख धर्मीय मतदारांची यादी तयार करुन निवडणूक घेण्यासाठी निम्नस्वाक्षरीतांना निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार संदर्भ 1 वर नमूद या कार्यालयाचे मतदार यादी कार्यक्रम दिनांक 03/07/2018 अन्वये प्रसिध्द करुन , अंतिम मतदार यादी दिनांक 03 नोव्हेंबर 2018 रोजी प्रसिध्द करण्यात येणार असल्याबाबत कार्यक्रमात नमूद करण्यात आले आहे.

दि.06/11/2018 ते दि.13/11/2018 या कालावधीत, शिख धर्मीयांचा 310 वा गुरता गद्दी समारोह 2018 संपन्न होणार असल्याचे अधिक्षक गुरुव्दारा सचखंड बोर्ड, नांदेड यांचे संदर्भ 2 वरील पत्र दिनांक 28/09/2018 अन्वये कळविले आहे. नांदेड शिख गुरुव्दारा सचखंड श्री हजूर अपचलनगर साहिब बोर्ड निवडणूक नियम 1963 चे नियम 12 नुसार नांदेड शिख गुरुव्दारा सचखंड श्री हजूर अपचलनगर साहिब बोर्डाच्या तीन सदस्य निवडणूकीसाठीची अंतिम मतदार यादी प्रसिध्दी नंतर एक आठवड्याच्या आत निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्याची तरतुद आहे.

पुर्वनियोजीत मतदारयादी कार्यक्रमानुसार दि.03/11/2018 रोजी अंतिम मतदार यादीची प्रसिध्दी केल्यास, दि.06/11/2018 ते दि.13/11/2018 या कालावधीतील शिख धर्मीयांचा 310 वा गुरता गद्दी समारोह 2018 संभाव्य निवडणूक कार्यक्रमाच्या कालावधीत येणार आहे. गुरु ता गद्दीच्या धार्मिक समारोहाच्या व्यस्त कार्यक्रमामुळे शिख बांधवांना निवडणूक कार्यक्रमामध्ये सहभागी होण्यास अडचणी निर्माण होऊ शकतात. तसेच या कार्यक्रमादरम्यान सदर निवडणूक कार्यक्रमाची पुरेशी प्रसिध्दी होणार नाही, अशी माझी धारणा झाली आहे.

निवडणूक कार्यक्रमाची व्यापक प्रमाणात प्रसिध्दी होऊन निवडणूक नि:पक्षपातीपणे, पारदर्शकपणे पार पडणे, यासाठी विषयांकीत निवडणूकीसाठीच्या अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्याच्या तारखेत योग्य तो बदल करणे आवश्यक असल्यामुळे, संदर्भ 1 वरील मतदार यादी कार्यक्रमात सुधारणा करण्याच्या निर्णयाप्रत मी आलो आहे.

**यास्तव नांदेड शिख गुरुव्दारा सचखंड श्री हजूर अपचलनगर साहिब बोर्ड निवडणूक नियम 1963 चे नियम 11 अन्वये नांदेड शिख गुरुव्दारा सचखंड श्री हजूर अपचलनगर साहिब मंडळाच्या तीन सदस्य निवडणूक 2018 साठी अंतिम मतदार यादी दि.03/11/2018 ऐवजी दि.22/11/2018 रोजी प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.**

सदरील शुध्दीपत्रक उपरोक्त मतदार क्षेत्रातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालये व गुरुव्दारा तख्त सचखंड श्री हजूर अपचलनगर साहिब बोर्ड नांदेडच्या सुचना फलकावर डकवून प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच सदरील शुध्दीपत्रक नांदेड जिल्ह्याचे संकेतस्थळ (वेबसाईट) www.nanded.gov.in वर देखील पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

**मतदार नोंदणी अधिकारी,**
**नांदेड शिख गुरुव्दारा सचखंड श्री हजूर**
**अपचलनगर साहिब मंडळ निवडणूक 2018**
तथा
**जिल्हाधिकारी, नांदेड**